# नगरपरिषद अंबरनाथ

## बाजार विभाग

जावक क्रं.अंनप/बाजार/२०१८-१९/६९ दिनांक :- ३० /०८ /२०१८

(जाहिरात अनु. क्रमांक ३१)

-: जाहीर नोटीस :-

विषय :- सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ सुरु होण्यापूर्वी करावयाच्या आगाऊ परवानगी अर्जा बाबत.

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्रं.न्यायाप्र २०१६/प्र.क्रं.१२७/नवि-१७ दि.१९/११/२०१६.

ध्वनी प्रदूषण नियम २००० व अनधिकृत मंडप उभारण्या संदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत.

२) शासन परिपत्रक क्रं.याचिका-३०१७/प्र.क्रं.१३०/नवि-२२ दि.१८/०२/२०१७.

अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स संदर्भात करावयाच्या कारवाई बाबत.

३) शासन परिपत्रक क्रं.न्यायाप्र २०१६/प्र.क्रं.१२७/(भाग-१)/नवि-१७ दि.०६/०३/२०१७.

जनहित याचिका क्रं.१७३/२०१० डॉ.महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर

(मंडप तपासणी संनियंत्रण समिती स्थापन करण्या बाबत)

४) शासन निर्णय क्रं.याचिका-३०१७/प्र.क्रं.१३०/नवि-२२ दि.१४/०३/२०१७.

अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स संदर्भात करावयाच्या कारवाई बाबत.

मा.उच्च न्यायालयाने सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ प्रसंगी उभारण्यात येत असलेल्या तात्पुरत्या मंडपाची तपासणी करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्यास अनुसरुन सदर समितीने सण/उत्सव/समारंभ सुरु होण्यापूर्वी किमान सात (७) दिवस अगोदर तात्पूरत्या मंडपाची तपासणी करुन अहवाल देण्या बाबत शासनाचे निर्देश आहेत.

सबब, आपणास यावर्षी सार्वजनिक सण/उत्सव/समारंभाकरिता मंडप उभारवयाच्या असल्यास प्रस्तावित मंडपाच्या लांबी व रुंदी नकाशासह तसा अर्ज सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ सुरु होण्याच्या किमान पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपरिषदेस करणे आवश्यक आहे. जेणे करुन आपल्या मंडळा तर्फे तयार करण्यात येणा-या मंडपाची तपासणी करण्या बाबत संबंधीत समितीला सुचविता येईल.

सार्वजनिक सण/उत्सव/समारंभ सुरु होण्याच्या पंधरा (१५) दिवस अगोदर पर्यंत आपला अर्ज नकाशा व सोसायटींचा ना-हरकत दाखल्यासह या कार्यालयात प्राप्त न झाल्यास आपणास सार्वजनिक सण/उत्सव/समारंभा मध्ये मंडप उभारण्यास परवानगी देता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच शहरातील नोंदणीकृत / नोंदणीकृत नसलेले अशा मंडळांनी त्वरीत कायम स्वरुपी अथवा तात्पुरत्या स्वरुपात नोंदणी करण्याची जबाबदारी संबंधीत मंडळाची असेल व नोंदणी अभावी काही कारवाई झाल्यास त्याची जबाबदारी संबंधीत मंडळाची राहील.

मुख्याधिकारी,
अंबरनाथ नगरपरिषद,
अं ब र ना थ.